**उपायुक्त (विशेष), अग्निशामक विभाग यांचे कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,**
पुणे-४११ ००५, दूरध्वनी क्र. २५५०१०००.

## जाहीर सूचना

०१) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ ( यापुढे याचा उल्लेख **अधिनियम** म्हणून केला जाईल) दिनांक ०६.१२.२००८ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाय योजना नियम २००९ (यापुढे याचा उल्लेख **नियम** म्हणून केला जाईल) दिनांक २३.०६.२००९ पासून नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, विशेष नियोजन प्राधिकरण (यापुढे याचा उल्लेख **प्राधिकरण** म्हणून केला जाईल) क्षेत्रात लागू झाले आहेत.

०२) वरील अधिनियमाच्या कलम ९(१) अन्वये लायसन्सप्राप्त अभिकरण नियुक्त करण्याचे अधिकार पुणे महानगरपालिका पुणे यांच्या मुख्य अग्निशमन अधिकारी यांना पुणे म.न.पा. कार्यक्षेत्रात प्रदान करण्यात आले आहेत.

०३) म्हणून पुणे म.न.पा. हद्दीत व शासन निर्णय क्रमांक टिपीएस-१८०९/६५०/प्र. क्र. १६५४/०९/नवि-१३, दिनांक २८.०८.२००९ नुसार हद्दीपासून १० कि.मी. परिघ क्षेत्रातील विकसक, वास्तुशास्त्रज्ञ, प्रॅक्टिसिंग इंजिनीअर, नगर रचनाकार तसेच मालक/भोगवाटादार यांनी त्यांच्या इमारतीचे आराखडे मंजूर करताना सदर अधिनियमातील कलम ३ प्रमाणे भारताची राष्ट्रीय बांधकाम संहिता २००५ मधील आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना तरतुदीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने इमारतीचे नकाशे पुणे महानगरपालिकेकडे सादर करून मंजूर करून घेणे बंधनकारक आहे.

०४) उक्त अधिनियमातील कलम ३(३) नुसार पुणे महानगरपालिकेच्या हददीतील व त्या लगतचे १० कि.मी. परिघ क्षेत्रातील मालक किंवा भोगवटदाराने नोंदणीकृत लायसन्स अभिकरण (**Licensed Agency**) मार्फत इमारतीमध्ये असलेली अग्निशमन यंत्रणा वर्षातून दोनदा म्हणजेच जानेवारी व जुलै महिन्यात कार्यान्वित असल्याबाबतचे प्रमाणपत्र पुणे महानगरपालिकेच्या संबंधित अग्निशामक अधिकाऱ्यांना सादर करावयाचे आहे. वरील नियमातील पोट कलम ३ नुसार पात्रताधारक व्यक्ती लायसन्स अभिकरण (**Licensed Agency**) म्हणून नियुक्त होण्यास निम्नस्वाक्षरीकराकडे अथवा पुणे महानगरपालिकेच्या मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडे अर्ज करून मान्यता घेवून पुणे महानगरपालिका क्षेत्र व त्यालगतचे १० कि.मी. परिघ क्षेत्रामध्ये लायसन्स अभिकरण (**Licensed Agency**) म्हणून काम करू शकतील. वरील अधिनियम व नियम पुढील संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**www.maharashtrafireservices.org**

०५) उक्त नियमातील तरतूदीनुसार पात्रताधारक लायसन्स अभिकरण (**Licensed Agency**) यांचेकडून विहीत नमुन्यात दिनांक ३१.०८.२०१० पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छूक व पात्र अभिकरणांनी दिनांक ३१.०८.२०१० पर्यंत निम्नस्वाक्षरीकार किंवा मुख्य अग्निशमन अधिकारी पुणे म.न.पा. यांचे कार्यालयात कार्यलयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) सर्व अनुषंगिक माहितीसह अर्ज सादर करावेत अधिक माहिती आवश्यक असल्यास निम्नस्वाक्षरीकारास अथवा पुणे महानगरपालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

सही

**(डॉ. प्रविण अष्टीकर)**

**उपायुक्त(विशेष),**

**अग्निशामक विभाग,**

**पुणे महानगरपालिका.**